सं.फौ.ख.क्र.४००/२०२५
शासन वि. अर्जुन
नि.क्र.५

**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्र.२**

नावः सुरेश हेमंत राजगडे,

वयः ३६ वर्ष, धंदाः दुय्यक निरीक्षक रा.उ.शु. ड विभाग,

पत्ताः पारशिवनी जि.नागपूर

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र.२ याचा सरतपास सहायक सरकारी अभियोक्ता श्री. एस. व्ही. तलमले यांच्यामार्फत शपथेवर सुरुः**

१. दि. २८/०३/२०२५ रोजी पारशिवणी येथे दुय्यक निरीक्षक रा.उ.शु. पारशिवनी ड विभाग येथे कार्यरत होतो. त्या रोजी माहिती मिळाली की आरोपी अर्जुन बेलेकर हा इटगाव येथे राहत्या घरी देशी दारुची अवैध्यरित्या दारु विक्री करतो. पंचाना माहिती दिली. पंचासह इटगाव गेलो. आरोपीच्या घरी गेलो. आरोपी तेथे मिळून आला आरोपीच्या घराची झडती घेतली असता एकून १४ लिटर मोहफूल दारू मिळून आली. मुद्देमालातुन रासायनिक परिक्षणाकरिता १८० मिली. दारू वेगळी काढली. नमूना सिल केला.घटनास्थळ पंचनामा तयार केला. आता मला घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला त्यावर, माझी व दोन पंचाची सही आहे तसेच आरोपीचा सही आहे. त्यातील मजकूर खरा व बरोबर आहे. त्यास **नि. क्र. ७** देण्यात आले. आता मला घर छडती जप्ती पंचनामा दाखविण्यात आला त्यावर माझी व पंचाची सही आहे तसेच आरोपीचा सही आहे. त्यातील मजकूर खरा आहे. त्यास **नि. क्र. ८** देण्यात आला. आरोपीची चेहरापट्टी केली. आता मला आरोपीची चेहरापट्टी दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर खरा आहे. त्यास **नि.क्र.९** देण्यात येते. आरोपीस सूचनापत्रावर सोडले. आता मला सूचनापत्र दाखविण्यात आला त्यावर माझी व आरोपीचा सही आहे. त्यातील मजकूर खरा आहे. त्यास **नि.क्र.१०** देण्यात येते. रासायनिक परिक्षणाकरिता अर्ज भरला. आता मला सदर अर्ज दाखविण्यात आला त्यावर माझी सही आहे त्यातील मजकूर खरा

आहे.त्यास **नि.क्र.११** देण्यात येते. रासायनीक परीक्षण अहवाल अभिलेखावर दाखल आहे. त्यास **नि. क्र. १२** देण्यात आला. तपासाअंती दोषारोपपत्र दाखल केले. मी आरोपीला ओळखतो. आज रोजी आरोपी न्यायालयात हजर आहे.

सरतपास पूर्ण

**आरोपीतर्फे श्रीमती व्ही. टी. चौधरी वकील मॅडम यांचेमार्फत उलटतपास सुरु.**

२. हे म्हणणे खरे आहे की, दि. २८/०३/२०२५ रोजी मी कर्तव्यावर हजर होतो याबाबत हजेरीपटाचा दस्त अभिलेखावर नाही. मी आज रोजी आरोपीचे घरचा क्रमांक सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे आहे की, आरोपीच्या घराचा दस्त प्राप्त केला नाही. हे म्हणणे खरे नाही की, सदर प्रकरणातील पंच हे नेहमीचे पंच आहे. हे म्हणणे खरे नाही की, कथित रोजी मी घटनास्थळी गेलो नाही. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीच्या ताब्यातून कोणतीही दारु जप्त केले नाही. हे म्हणणे खरे नाही की, रासायनीक एक परिक्षणाकरिता वेगळी काढली नाही. हे म्हणणे खरे नाही की, जप्ती व घर झडती पंचनामा कार्यालयात तयार केले. हे म्हणणे खरे नाही की, वरिष्ठांच्या सांगण्यावरुन खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास पुर्ण.

फेरतपास नाही.

श्रवणोत्तर स्वीकृत,

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2026.04.17 15:34:48 +0530

**(जी.ओ. वानखडे)**

न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

समक्ष

GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Digitally signed by GAJENDRA ONKARRAO WANKHADE
Date: 2026.04.17 15:34:52 +0530

**(जी.ओ. वानखडे)**

न्यायदंडाधिकारी प्र.श्रे.पारशिवनी

दिनांकः १७/०४/२०२६